## प्रकरण दुसरे

# वस्तुसंग्रहालय – एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप

# प्रकरण दुसरे

# वस्तुसंग्रहालय – एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप

**प्रस्तावना :**

विविध वस्तूंचा संग्रह ज्या ठिकाणी केलेला असतो त्या ठिकाणाला सामान्यत: संग्रहालय म्हणून संबोधले जाते. मानव मानसिकदृष्ट्या समाजप्रिय आणि संग्रह प्रिय प्राणी आहे. मानवाच्या या संग्रह करण्याच्या प्रवृत्तीचा प्रारंभ अदिमानव काळापासून मानावा लागेल. कारण प्रथम तो अन्नाचा संग्रह करू लागला. त्यानंतर हत्यारे, प्राणी, वनस्पती, बियाणे, निसर्गातील चमत्कारिक वस्तूंचा संग्रह करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. काळानुरुप याच्या स्वरुपात बदल होऊन यातूनच संग्रहालय किंवा वस्तुसंग्रहालय या संकल्पनेचा उदय आणि विकास झाला. प्रस्तुत प्रकरणामध्ये वस्तुसंग्रहाचे महत्त्व, व्याख्या, उदय आणि विकास व भारतातील वस्तुसंग्रहालयांचा उदय आणि विकास, प्रकार यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व :** मानवी जीवनात वस्तुसंग्रहालयास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक दृष्टिकोणातून अनन्यसाधारण महत्त्व असून आजच्या माहिती तंत्रज्ञान युगात याचे महत्त्व वाढीस लागलेले आहे.

वस्तुसंग्रहालय एक प्रकारचा आरसा आहे की, ज्यामध्ये मानवी जीवनाच्या विविध अंगांचे प्रतिबिंब पडते आणि म्हणूनच बॅनर्जी एम्.आर. यांनी आपल्या 'द म्युझियम ॲण्ड द एज्युकेशन सिस्टीम' या लेखात सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक भूमिकेच्या पलिकडे जाऊन एका आढळ स्फूर्ती केंद्राचा उल्लेख केला आहे.[१] राष्ट्राच्या दृष्टीने संस्कृती फार महत्त्वाची असते. राजकीय व्यक्ती किंवा सामान्य व्यक्ती काळाच्या ओघात नष्ट होतात, परंतु सांस्कृतिक जडण-घडण चालूच असते. ही सांस्कृतिक जडण-घडण जतन व संवर्धन करण्याचे कार्य वस्तुसंग्रहालये पार पाडतात. संग्रहालयाची भूमिका अधोरेखीत करताना बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड[२] (१८६९-१९३९) नमूद करतात.

कोणत्याही देशाच्या संस्कृतीची किंमत जर आपल्याला अजमावयाची असेल तर त्या देशातील ललित कलाकडे आपण लक्ष द्यावे. संगीत, शिल्पकला, चित्रकला आदि गोष्टी राष्ट्राच्या संस्कृतीची चिन्हे आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला प्रकाश व चैतन्य प्राप्त होते.[३] आणि हे कार्य वस्तुसंग्रहालयांच्या माध्यमातून होते. वस्तुसंग्रहालये नसती तर प्रा. आर्थर मार्विक यांनी वर्णन केल्याप्रमाणे ''ज्या राष्ट्राला आपला इतिहास माहित नसतो अशा राष्ट्राची स्थिती स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखी होते.''[४] वस्तुसंग्रहालयांच्या माध्यमातून मानवाच्या कष्ट साध्य प्रगतीचा आलेख प्राप्त होत असल्याने वस्तुसंग्रहालय हे भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी ज्योत आहे. श्री राजा (दिनकर) केळकर,[५] (१८९६-१९९०) वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व विषद करताना म्हणतात, ''ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय राष्ट्राचे सांस्कृतिक धन आहे, गत जीवनाचा वैभवशाली वारसा आहे. अशा या अविस्मरणीय स्मृतिरेखा आणि मंगल चिन्हे जतन करून ठेवणे आपले पवित्र कर्तव्य आहे.''[६] याच दृष्टिकोणातून त्यांनी केळकर वस्तुसंग्रहालयाची निर्मिती केली. इतिहासलेखनात वस्तुसंग्रहालयास साधनात्मक महत्त्व आहे. इतिहासाचे पूर्वीच स्वरुप मर्यादित होते. परंपरागत इतिहासकार समाजाचा एकजिनसीपणा, एकसारखेपणा गृहीत धरून भूतकाळाच्या सहाय्याने वर्तमान काळापासून जाणून घेण्याचा प्रयत्न करत होता. मात्र २१व्या शतकात इतिहासातील संकल्पनात बदल आल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इतिहास जसा घडला तसा जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व वाढले आहे.[७]

आधुनिक फ्रेंच तत्वज्ञ अन्तोनिओ ग्रामशीच्या[८] (१८९१-१९३७) तळा-गाळातल्यांचा इतिहास (History from Below) या इतिहासाच्या बदलत्या संकल्पनेने इतिहासाला नवे रुप दिले आणि सर्वांगिण इतिहासांचे (History in totality) स्वरुप जगापुढे ठेवले. अगदी दैनंदिन व्यवहार, पेहराव ते खाद्यपदार्थापर्यंत सर्वांना इतिहास लेखनात समाविष्ठ करून घेता आले पाहिजे असा प्रवाह सुरु केला. म्हणजेच स्थानिक

इतिहासापासून ते सांस्कृतिक इतिहासाला महत्त्व दिले.[९] फ्रेंचविदूषी व्हॅलरी स्टील आपल्या 'Paris Fashion' (१९८८) या ग्रंथात सांस्कृतिक इतिहासाविषयी असे नमूद करतात की,

"Fashion Culture is not the same as Fashion. It involves new social values, new farms of communications, ultimately new values and new attitudes.'[१०]

समाज एकजिनसी नाही, एकसारखा नाही, त्यात विविधता आहे हे ग्राह्य माणून नव इतिहासकार वर्तमानकालीन वास्तवाच्या आधारे भूतकाळ उलगडून दाखविण्याचा प्रयत्न करतो. सर्वसाधारण लोक, वर्ग, जात, टोळ्या, गट आणि इतर सर्व लोक, लोक-समुदाय ज्यांची परंपरागत इतिहासाने नोंद (लिखित स्वरुपात) इतिहासात सर्वार्थाने दुर्लक्षित राहिली आहे. या सर्व तत्सम वार्णींच्या अभ्यासाचा आणि संशोधनाचा अंतर्भाव नव इतिहासात होतो.[११] त्यामुळे हा इतिहास भौतिक व मौखिक साधनांचा आधार घेऊन लिहिला जाऊ शकतो. यामध्ये भौतिकसाधने महत्त्वाची आहेत. इतिहासलेखन कागदपत्राशिवाय करता येत नाही हे जरी खरे असले तरी इतिहास लेखन करताना कागदपत्रांच्यामध्ये ज्या मोकळ्या जागा राहतात त्या भरून काढण्याचे काम भौतिक (पुरातत्वीय) व मौखिक साधने करतात. भौतिक साधनामध्ये भांडी, शिल्पाकृती, अलंकार, बांगड्या, पोषाख, खापराचे तुकडे व इतर अनेक पुरातत्वीय साधने तत्कालिन समाज व सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकण्यास मदत करतात. या सर्व वस्तू जतन व संवर्धन करण्याचे कार्य वस्तुसंग्रहालयातून होते, त्यासाठी वस्तुसंग्रहालये महत्त्व आहे. वि.का. राजवाडे[१२] (१८६३-१९२६) यांच्या मते, "कोणत्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या चरित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटला म्हणजे तो अनेक दृष्टीने केला पाहिजे. धर्म, नीती, विद्या, समाज, व्यापार, कृषी, कलाकौशल्य, कायदेकानून, राजकारण व तत्सिद्यर्थ केलेल्या अंत:स्थ व बहि:स्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा निर्गतीचा कालक्रमाने तथाकथित, बांधेसूद, पद्धतशीर व सप्रमाण विचार केला जाऊन तो पुन्हा आत्मिक व भौतिकरित्या झाला म्हणजे राष्ट्राचे चरित्र समग्र कळले असे होते."[१३] विश्वासाहर्त साधनाच्या शिवाय इतिहासलेखन अशक्य आहे. आणि या

संदर्भात अनेक महत्त्वाच्या साधनांचे संवर्धन व जोपासणा झाल्यामुळे इतिहास लेखनात एक साधन म्हणून महत्त्व आहे. अभ्यासात वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व विषद करताना डॉ. श्री.व्यं. केतकर [१४] असे नमूद करतात की, ''आजच्या उपलब्ध ग्राह्य वस्तूचे व्यवस्थित संग्रहण व अभ्यास झाला पाहिजे. प्राकृतापासून संस्कृत व संस्कृतापासून प्राकृत, त्याचप्रमाणे ग्राम्य वस्तूपासून नागर वस्तू आणि नागर वस्तूपासून पुन्हा त्यांच्या ग्राम्य प्रतिकृती या क्रिया भांडी, उपकरणे, गृहरचना, वेश या सर्वांमध्ये पाहावयास सापडतील. जे मूळ प्राकृत आहे त्याच्या संस्कृत रुपांतरावरून प्राकृत ग्रंथ पुन्हा तयार होण्याची प्रक्रिया झालेली आहे. संस्कृत व प्राकृत वाङ्मयाचा संयुक्त अभ्यास झाला पाहिजे. त्याचप्रमाणे नागर आणि चित्रकला यांचा अभ्यास होण्यासाठी वस्तूसंग्रहालयास महत्त्व आहे.''[१५]

**वस्तुसंग्रहालयाचे शैक्षणिक महत्त्व :** मनुष्याला आपल्या अंगच्या कला, अभिरुची वाढविण्यासाठी व लेखक, कवी, कलाकार व शास्त्रज्ञ इ. व्यक्तीना आपल्या विषयाची आवड, व्याप्ती आणि संशोधन वृत्ती व्यापक करण्यासाठी वस्तुसंग्रहालये परिणामकारक साधन आहे.[१६] याशिवाय संग्रहालयातून कलेचा इतिहास कळतो. याच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दृकश्राव्य स्वरुपात शिक्षण मिळते. त्यामुळे संग्रहालय ही सरळ शिक्षण देणारी एक संस्थाच आहे.[१७] प्रदर्शित केलेल्या वस्तू आणि भेट देणाऱ्या व्यक्तीत एक प्रकारे संवाद साधण्याचे कार्य होते. यांच्या माध्यमातून प्रेक्षकांचे/पर्यटकांचे मनोरंजन, विद्यार्थ्यांचे कुतुहल व जिज्ञासा वाढीस लागण्यास मदत होते.[१८] शिक्षण प्रभावी व परिणामकारक करण्यासाठी स्वाध्याय पद्धत ही सर्वात चांगली पद्धत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना देण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षकाला करावे लागते. त्यांच्या आशा-आकांक्षा विस्तारित करण्यासाठी नेहमीच्या पद्धतीपेक्षा वेगळा मार्ग, विविध पद्धतीतून शिक्षणाची प्रगती करावी लागते. यामध्ये वस्तुसंग्रहालये विशेष उपयोगी ठरत आहेत.[१९] संग्रहालयाच्या शैक्षणिक महत्त्वाविषयी तत्कालिन मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री खेर यांनी नमूद केले आहे की, ''पूर्वी वस्तुसंग्रहालय म्हणजे प्राचीन अवशेष राखून ठेवणारी व ज्यामध्ये विद्वान शास्त्रज्ञांनाच रस आहे व त्या वास्तूची मांडणी शास्त्रीय

पद्धतीने झाली आहे अशी वास्तू होती. परंतु आधुनिक वस्तुसंग्रहालय म्हणजे शिक्षण देणारी एक संस्थाच आहे. वस्तुसंग्रहालय म्हणजे विद्यापीठच होय की, ज्याच्यामार्फत विद्यादानाचे कार्य केले जाते.''[२०]

**व्युत्पत्ती शास्त्राच्या** दृष्टिकोणातून विचार करता 'Museum' या इंग्रजी संज्ञेचे मूळ 'Museion' (ग्रीक पुराणातील कलेच्या देवतेचे निवासस्थान) या संज्ञेत आढळते.[२१] प्रस्तुत संशोधन प्रबंधामध्ये 'Museum' या शब्दाला वस्तुसंग्रहालय हा समानार्थी शब्द वापरला आहे.

**वस्तुसंग्रहालयाची व्याख्या :** भारतीय संस्कृती कोशामध्ये ''नानाविध वस्तूंचा संग्रह जिथे व्यवस्थितपणे ठेवलेला असतो अशा स्थानाला संग्रहालय किंवा वस्तुसंग्रहालय म्हणतात.''[२२] अशी संग्रहालयाची व्याख्या केली आहे. 'International Council of Museums' (ICOM) या संस्थेने संग्रहालयाची व्याख्या संशोधन, संघटन, प्रशासन व प्रदर्शन या घटकांना केंद्रभूत मानून केलेली आहे. ती अशी, "A museum is permanent establishment, administered in the general interest for the purpose of preserving, studying, enhancing to the public for its objects and specimens of cultural value, artistice, historical, scientific, and technological collections, botanical and zoological gardenes and aqurinte" [२३]

''मानवी जीवनाच्या भूत, वर्तमान व भविष्य काळातील सर्व व्यवहारासंबंधी वस्तूचे हेतूनिष्ठ शास्त्रीय संग्रहण करून त्यांचे तत्व वा उद्देशानुसार जनतेच्या सर्व वा विशिष्ठ वर्गासाठी पद्धतशीर वर्गीकरण, प्रदर्शन व संरक्षण करून मनोरंजन व ज्ञान या साधनांनी मानवी प्रगतीच्या कडा रुंदावण्यास मदत करणारी संस्था म्हणजे संग्रहालय'' अशी व्याख्या श.म. केतकर यांच्या 'संग्रहालय परिचय' या ग्रंथात आढळते.[२४] या संदर्भात 'युनेस्को' ने संग्रहालयाची व्याख्या खालीलप्रमाणे केलेली आहे व ती सर्वमान्य ठरलेली आहे. ''सर्वसामान्यांचे हित संरक्षणासाठी, अभ्यासासाठी ज्या अनेक साधनांचा वापर केला जातो

आणि विशेषत: जनतेच्या आनंदासाठी जी वास्तू आणि विशेषत: जनतेच्या आनंदासाठी जी वास्तू असते त्याला वस्तुसंग्रहालय म्हणतात.''  अशा वस्तुसंग्रहालयात सांस्कृतिक मूल्ये, कलात्मक वस्तू, ऐतिहासिक, शास्त्रीय, तांत्रिक बाबीचे प्रदर्शन केले जाते. [२५]

**वस्तुसंग्रहालयाचा उगम आणि विकासाचे :** स्थूलमानाने प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ व आधुनिक काळ असेतीन टप्पे पडतात. त्या काळानुरुप परिस्थितीनुसार संग्रहालयात स्वरुपात्मक बदल दिसून येतात.

इजिप्तमध्ये देवळाशेजारी मनोरंजनासाठी पशुसंग्रहालय निर्माण केलेली असत. इ.स. पू. १४०० मध्ये इजिप्तची राजकन्या 'ह्यसू' ने ''गार्डन ऑफ अक्लमेशन'' या नावाचे उद्यान निर्माण केली होती व या उद्यानामध्ये इजिप्तमध्ये न दिसणारे प्राणी ठेवलेले होते. इ.स.पू. १२व्या शतकात चीनमध्ये 'चौ' घराण्यातील 'वेन' राजाने 'गार्डन ऑफ इन्टेलिजन्स' हे पशुसंग्रहालय उभे केले होते.[२६] अथेन्स शहरात सर्वप्रथम 'संग्रहालय' स्थापण्याचा पहिला मान ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलकडे [२७] (इ.स.पू. ३८४-३२२) जातो. ॲरिस्टॉटलनंतर थिअॅक्रॅस्टस् याने विद्यालयाच्या जोडीला एक संग्रहालय निर्माण केले होते. अलेक्झांडर दि ग्रेट [२८] (इ.स.पू. ३५६ ते ३२३) हा दुर्मिळ वस्तूंचा छंद होता. प्रत्येक स्वारीतून तो दुर्मिळ वस्तू गोळा करून आणत व आपल्या संग्रहालयात ठेवीत असे.[२९]

इ.स.पू. २९० मध्ये अलेक्झांड्रियामधील टॉलेमी (इ.स.पू. ३२३-३०८) राजाने स्वत:च्या राजवाड्यात संग्रहालय सुरु केल्याची नोंद मिळते.[३०] यामध्ये 'अलेक्झांडर दि ग्रेट' यांचा ग्रंथ संग्रह ठेवण्यात आलेला होता.[३१] पहिल्या टॉलेमीनंतर दुसऱ्या टॉलेमी (इ.स.पू.३०८-२४६) राजाने सात लाख हस्तलिखिते एकत्र करून मोठे संग्रहालय केल्याचा उल्लेख मिळतो.[३२]

मध्ययुगीन युरोपमध्ये (५वे ते १५वे शतक) धर्माच्या प्रभावामुळे प्रार्थना मंदिर उभारणीकडे अधिक कल होता. कलाकारांनी देखील आपली कला प्रार्थना मंदिरासाठी

वापरली. राजे महाराजांनी व सामान्य लोकांनी स्वत: जवळील वस्तू प्रार्थना मंदिरांना भेट दिल्याने प्रार्थना मंदिरालाच एक प्रकारे संग्रहालयाचे स्वरुप प्राप्त झाले.[३३]

इटलीमधील राजे व सरदार यांना जुन्या मौल्यवान वस्तूचे महत्व समजले तेव्हा त्यांनी स्वत:कडील प्राचीन काळापासून जपून ठेवलेल्या वस्तू फक्त सांभाळण्यासाठी नसून त्या वस्तू आनंदासाठी आहेत अशी त्यांची भावना दृढ होत गेली.[३४] नंतरच्या काळात श्रीमंत व प्रतिष्ठित लोकांच्या असे लक्षात आले की, त्यांच्या संग्रही असणाऱ्या वस्तूमुळे त्यांची लोकप्रियता व महत्त्वही वाढते आहे. त्यामुळे फ्लॉरेन्समधील श्रीमंत व्यक्तीनी स्वत:कडील मौल्यवान वस्तूंची प्रदर्शने भरवण्यास सुरुवात केली. परिणामी संग्रहालयाच्या संकल्पनेचा विकास होण्यास मदत झाली.[३५] या काळात लोकांच्या मनामध्ये संग्रहालयाबद्दल कोणती भावना होती. याबद्दल श्री. एच् .डायफूक "Museam Techniques in fundamental education" या ग्रंथात म्हणतात. ''सामान्य लोकात अशी धारणा होती की संग्रहालय हे हस्तिदंती बंगले आहेत. प्रचंड इमारती मध्ये मानवाच्या युगांच्या प्रगतीची दर्शक अशी साधन सामग्री ठेवलेली असे त्याच्या विरूध्द टोकाला भौतिक शास्त्राची संग्रहालये किंवा पुरातत्व संग्रहालयामध्ये अनेक प्रकारचे किटक वेगवेगळया प्रकारच्या पक्षाचे सांगाडे, दगडासह पुरावे ठेवलेले असतात.''[३६]

पुर्नरुजीवन चळवळीमुळे पंधराव्या शतकापासून युरोपात वैचारिक, बौद्धीक व भौतिक क्षेत्रात प्रचंड बदल घडून ज्ञान संपादनाची नवीन दालने सर्वसामान्यासाठी खुली होण्यास मदत झाली. फ्रॉन्सचा राजा फ्रॅन्सिस पहिला (१४९४-१५४९) याने स्वत:जवळ असलेल्या मौल्यवान वस्तुची प्रदर्शने मांडली, त्याची ही प्रदर्शने 'फॉन्टेल ब्लू' येथे भरवण्यात येत असत. आरेलिन्सचा डयूक जीन बॅप्टीस्ट गॅसटोन याने पॅरिसमध्ये आपल्याजवळील मौल्यवान वस्तूचे वस्तुसंग्रहालय केले. या वस्तुसंग्रहालयाला त्यावेळी 'म्युझिओ' व 'गॅलरिया' असे म्हणत.[३७] पुढे युरोपात अशी अनेक खाजगी संग्रहालये निर्माण झाली. राजे, सरदार व श्रीमंत लोक आपआपल्या आवडीप्रमाणे भिन्न भिन्न वस्तू जमवून आपल्या घरीच त्याचे प्रदर्शन करीत. इ.स. १६८३ मध्ये ''ऑक्सफर्ड

युनिव्हर्सिटी''च्या 'स्कूल ऑफ नॅचरल हिस्ट्री'चा एक विभाग म्हणून 'अॅश्मोलियन म्युझियम' स्थापन करण्यात आले. तेच जगातले व्यवस्थित स्थापिलेले प्रथम संग्रहालय होय.[३८]

मौल्यवान वस्तूचे प्रदर्शन ही संग्रहालयामागची मर्यादित संकल्पना मागे पडून संग्रहालय विकासास मूलभूत शास्त्रीय बैठक आधुनिक युरोपने दिली. ही नव विकसित आदर्श संग्रहालयाची संकल्पना बर्ज यांनी खालील प्रमाणे मांडली. "The ideal museum should represent the universeby menans of a systematic classifieation of all subjects matter" कवीच बर्जचे हे विधान संग्रहालय विकासाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. याची परिणीती १७२७ साली सी.एफ्. निकेलस यांच्या "Museogrophia" या ग्रंथ निर्मितीत झाली. सर हॅन्स स्लोन याने इंग्लंडमध्ये संग्रहालय स्थापने संदर्भात चर्चा सुरू केली. इ.स. १७५९ साली सर हॅन्स स्लोन यांच्या सर्व वस्तू ब्रिटिश सरकारने विकत घेतल्या व 'ब्रिटीश म्युझियम'ची स्थापना केली. शिवाय यामध्ये मौल्यवान कागदपत्रे ठेवण्याची पध्दत सुरू झाली.[३९]

इ.स. १७९३ मध्ये फ्रान्समधील तत्कालीन सरकारने पॅरिसमधील राजाच्या सर्व वस्तू एकत्र करून सार्वजनिक वस्तुसंग्रहालयाची स्थापना केली. कारण या काळात फ्रान्समधील राजवाडयातून व सरदाराच्या मालकीच्या मौल्यवान वस्तू इंग्लंडला पाठवल्या जात होत्या.[४०] पुढे याच धर्तीवर विविध देशात वस्तुसंग्रहालये स्थापन झाली, यामध्ये बुडापेस्ट, (१८०२) लंडन, (१८१४), माद्रीद, (१८१९) बर्लिन, (१८३०) व म्यूनिच (१८३०) इ. समावेश होतो.

**भारतातील वस्तुसंग्रहालयांचा उदय आणि विकास :** भारतातील वस्तुसंग्रहालयांचा उदय आणि विकासाचा विचार करता, प्राचीन काळातील मंदिरांचा संग्रहालय म्हणून उल्लेख करावा लागतो. कारण ही मंदिरे सांस्कृतिक जीवनाची केंद्रबिंदू होती. याच्या अनुषंगाने विविध कलांचे अविष्कार होत असत वास्तुकार, चित्रकार, मूर्तिकार, कवि इ. मंदिरात निश्चित अशी कार्ये होती. म्हणून धार्मिक आणि तत्कालिन

समाज जीवनात मंदिरांचे विशेष असे योगदान होते.[४१] त्यामुळे प्राचीन बौद्ध स्तूप, जैन, हिंदु मंदिरे व लेणी ही सुद्धा एक प्रकारची संग्रहालये मानावी लागतील.[४२] याशिवाय भारतात प्राचीन विद्यापीठे होती. त्या विद्यापीठात मोठे ग्रंथसंग्रह होते. जगप्रसिद्ध असलेल्या नालंदा विद्यापीठातील 'धर्मगंज' नावाच्या परिसरात 'रत्नसागर', 'रत्नरंजक' व 'रत्नोदशि' नावाची तीन भव्य ग्रंथालये होती. यामध्ये प्रचंड हस्तलिखिते संग्रहीत होती.[४३]

प्राचीन काळातील संग्रहालयाची ही परंपरा मध्ययुगातही सरदार, श्रीमंत लोक व राजेरजवाडे यांनी चालू ठेवली होती. त्यांच्या वाड्यातील वस्तुसंग्रहदेखील बरेच मोठे व बहुमोल असत. त्यांचे प्रदर्शन करून स्वत:ची प्रतिष्ठा वाढवणे हा त्यांचा उद्देश असला तरी लोकांचे मनोरंजन व शिक्षण या दृष्टीने त्यांना महत्त्व होते.''[४४] मध्ययुगीन काळात संग्रहालयाचे त्रोटक उल्लेख आढळतात. अकबर (१५४२-१६०५) सारख्या मुघल सम्राटांनी चित्रशाळा विकसित करण्याकडे विशेष लक्ष दिले. अकबराच्या चित्रशाळेतील 'हम्जानामा'[४५] या दुर्मिळ चित्रसंग्रहात २७''x २०'' या आकाराची १२०० चित्रे संग्रहीत असल्याची नोंद मिळते. सध्या यामधील काही चित्रे व्हिएना येथील औद्योगिक कला संग्रहालय व लंडनमधील 'व्हिक्टोरिया अलबर्ट म्युझियम' व 'ब्रिटिश म्युझियम'मध्ये संग्रहीत आहेत.[४६] बादशाह जहाँगीरचा (१६०५-२८) काळ हा चित्रकलेतील 'सुवर्ण युग' मानला जातो. जहाँगिराने त्याच्या काळातील महत्त्वपूर्ण घटना, दरबारातील महत्त्वपूर्ण सभा, विविध फुले व वृक्ष, सण-उत्सव व इतर अनेक विषयावरील चित्रे तयार करून त्याचा संग्रह केलेला होता. यातील काही चित्रे 'रजा लाइब्ररी', रामपुर व भारतीय संग्रहालय, नवी दिल्ली मध्ये संग्रहीत आहेत. त्यांच्या काळात अबुल हसन, उस्ताद मंसूर, फारूख बेग, मुहम्मद नादीर, बिशनदास इ. प्रसिद्ध चित्रकार होते.[४७]

तंजावरमध्ये शरफोजी तिसरे यांनी अनेक हस्तलिखाचा संग्रह असलेले 'सरस्वती महाल' हे ग्रंथालय स्थापन केले.[४८] मिर्झा राजा जयसिंग (१६२१-१६६७) याने एक चित्रशाळा स्थापन करून त्यामध्ये आंचलिक (ग्रामीण) लोककलेवर आधारीत चित्राचा संग्रह केल्याचा उल्लेख मिळतो. महाराज सवाई जयसिंह[४९] (१६६९-१७४३) यांच्याकडे

मोठ-मोठ्या आकाराच्या व्यक्तिचित्राचा संग्रह होता. ही चित्रे सध्या जयपूरमधील 'सिटी पॅलेस' संग्रहालयात आहेत. सवाई प्रतापसिंह (१७७९-१८०३) यांची विशाल चित्रशाळा होती. त्यामध्ये पौराणिक ग्रंथावर आधारीत चित्रित केलेल्या चित्राचा संग्रह होता.[५०]

उत्तर भारतात ज्याप्रमाणे चित्रकलेला व चित्रकाराना प्रोत्साहन व राजाश्रय लाभला त्या तुलनेत महाराष्ट्रातील कला व कलाकार दुर्लक्षित राहिले.[५१] मात्र पेशव्यांच्या अठ्ठरा कारखान्यामध्ये पुस्तकशाळा होती, त्यावर गोविंदपंत आपटे यांना प्रमुख नेमलेले होते.[५२] सातारचे शाहू महाराज (१७०८-४९) विविध पशु-पक्षांच्या संग्रहासाठी प्रसिद्ध होते.[५३] पुण्यातील बाजीराव पेशव्यांचा (१७२०-३९) प्राणी संग्रह देखील आकर्षणाचे केंद्र होते. या प्राणीसंग्रहालयाची जबाबदारी त्रिंबक सदाशिव यांच्याकडे होती.[५४] पर्वती जवळील या प्राणी संग्रहालयास सवाई माधवरावाच्या (इ.स. १७७४) कारकिर्दीत भव्य स्वरुप प्राप्त झाले. यामध्ये सिंह, गेंडा, पोपट, बोलक्या मैना, पंडोल पक्षी, मोर, दोनशे हरणे, चार चित्ते, ससे, वाघ होते. या संग्रहालयास महादजी शिंदे (१७२७-९४) यांने उत्तर हिंदुस्थानातून गेंडे, एडके, बदके, पाणकोंबडी पाठवल्याचा उल्लेख मिळतो.[५५]

**ब्रिटीश काळातील भारतातील वस्तुसंग्रहालयाचा विकास :** भारतातील वस्तुसंग्रहालयांचा विकास आणि विस्तार होण्यास ब्रिटीश काळात प्रारंभ झाला. यामध्ये स्थूल मानाने तीन घटक महत्त्वाचे ठरले. १) विद्वानांचे व संस्थांचे प्रयत्न २) व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहण समारंभ (१८८७) ३) पुरातत्वशास्त्रीय सामग्रीची पुर्नरचना करण्यासाठी व्हाइसरॉय (राजप्रतिनिधी) लॉर्ड कर्झनने (१८९९-१९०५) केलेले प्रयत्न[५६] या अनुषंगाने भारतातील संग्रहालयांचा इतिहास तीन टप्प्यात अवलोकला जाऊ शकतो.

एस्.जे.बक्षी यांनी आपल्या 'मॉडर्न म्युझियम्स' या ग्रंथात भारतातील संग्रहालय विकासाचे तीन टप्पे दिलेले आहेत.

१) १८१४-१९०२ : भारतातील संग्रहालय स्थापनेची सुरुवात ते लॉर्ड कर्झनच्या आगमणापर्यंतचा काळ.

२) १९०२ ते १९४६ : लॉर्ड कर्झनचा काळ ते ब्रिटिश सत्तेच्या अस्तापर्यंतचा काळ.

३) १९४७ पासून पुढे : (स्वातंत्र्योत्तर काळ).[५७]

मात्र वरील कालखंड चूकीचा वाटतो. कारण भारतामध्ये पहिले संग्रहालय इ.स. १७५६ मध्ये स्थापन झाले.[५८] व लॉर्ड कर्झन १८९९ मध्ये 'व्हाईसरॉय' (राजप्रतिनिधी) म्हणून भारतात आला व तो १८०५ पर्यंत होता.[५९] इ.स. १८५७ मध्ये ब्रिटिशांच्या राजकीय अधिसत्तेचे रुपांतर इंग्लंडच्या राणीच्या साम्राज्यात झाले. त्यांच्या संपर्कामुळे सांस्कृतिक प्रक्रियांना व कांही ज्ञान शाखाकडे वेगळ्या दृष्टिकोणातून बघण्याची मानसिकता रुजण्यास सुरुवात झाली. प्राचीन काळाविषयी पुरातत्त्वाच्या दृष्टिकोणातून मिमांसा करण्याची आणि त्यासाठी संग्रहालये उभारणी करण्याची धडपड हा त्या नव्या दृष्टिकोणाचा भाग होता. पाश्चात्य देशांच्या धर्तीवर भारतातही 'दुर्मिळ वस्तू' गोळा करण्याची, त्याप्रमाणे शेतीच्या, हस्तकलेच्या व उद्योग धंद्याच्या मालाचे मेळे (प्रदर्शन) भरवण्याची प्रथा निर्माण झाली.'[६०]

सर विल्यम जोन्स[६१] (१७४६-१८९४) द्वारा इ.स. १७८४ मध्ये स्थापन केलेली 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' ही संस्था संग्रहालय विकासातील एक मैलाचा दगड ठरली. खऱ्या अर्थाने तेंव्हापासून संग्रहालय स्थापनेस व विकासास गती मिळाली. कारण या संस्थेच्या सदस्यानी देणगी स्वरुपात दिलेल्या दुर्मिळ वस्तूंच्या संगोपणाचा प्रश्न संस्थेसमोर उभा राहिला. त्यामुळे या देणगी स्वरुपात मिळालेल्या दुर्मिळ वस्तूंचीमांडणी स्वतंत्ररित्या करण्यासाठी जागेची व इमारतीची निकड जाणवत होती.[६२] यातूनच इ.स. १७९६ मध्ये स्वतंत्र इमारत बांधण्यात येऊन त्यामध्ये वस्तुसंग्रहालय स्थापन करण्यात आले.[६३] नंतरच्या काळात देखील संस्थेकडे विविध वस्तूंचा ओघ सुरुच राहिला. या पार्श्वभूमीवर इ.स. १८१४ मध्ये डॉ. वालिश (डॅनिश वनस्पतीशास्त्रज्ञ) यांनी आणखी एक संग्रहालय स्थापन करण्याची विनंती करून त्याचा अवैतनिक अध्यक्ष म्हणून स्वत: काम करण्याचे व स्वत:कडील मौल्यवान वस्तूच्या समकृती पुरवण्याचे मान्य केले. ही सूचना मान्य करून पुरातन, भूस्तरशास्त्र, प्राणीशास्त्र व मानसशास्त्रविषयक विभाग असलेले

संग्रहालय स्थापन करणयात आले.[६४] हेच भारतातील व्यवस्थित स्थापलेले पहिले वस्तुसंग्रहालय मानले जाते.[६५] इ.स. १८३६ चे वर्ष 'एशियाटीक सोसायटी'ला आर्थिक हानीचे ठरले. त्यावर मात करण्यासाठी सोसायटीने सरकारकडे आर्थिक साह्याची विनंती केली. या विनंतीचा विचार करून 'ईस्ट इंडिया कंपनी'च्या संचालक मंडळाने १८३९ मध्ये संग्रहालयासाठी निधी उपलब्ध करून दिला. परिणाम स्वरुप वस्तुसंग्रहालयाच्या विकासास नवीन दिशा मिळाली व भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती झाल्यास त्यावर मात करण्यासाठी स्वत: अनुदान राखुन ठेवण्याचा अधिकार भारत सरकारला (India Goverenment) दिला.[६६]

मद्रास येथे (सध्याचे चैन्नई) १८१९ पासून संग्रहालय स्थापन करण्यासाठी प्रयत्न चालू होते. इ.स. १८२८ मध्ये लंडनच्या 'एशियाटीक सोसायटी'ची पुरक संस्था असलेल्या 'मद्रास लिटररी सोसायटीने' देखील यास पाठिंबा दिला व त्यासाठी बरेच प्रयत्न केले. अखेर इ.स. १८४३ मध्ये त्यांनी 'ईस्ट इंडिया कंपनी'च्या संचालक मंडळाला संग्रहालय स्थापण्यासाठी विनंती केली. या विनंतीचा विचार करून मद्रास येथे मध्यवर्ती संग्रहालय स्थापण्याचे मान्य केले व सोसायटीचे सदस्य एडवर्ड ग्रीन बाल्फर (असिस्टंट सर्जन) यांनी या संग्रहालयाचे मुख्य अधिकारी होण्याचे मान्य केले. बाल्फर यांच्या वैयक्तिक प्रयत्नामुळे या संग्रहालयाचे बांधकाम देखील अल्पावधीत पूर्ण झाले व त्यांच्या प्रोत्साहनाने बंगलोर, चिरुचिरापल्ली, कोईमतूर, कड्डालोर, उटकमंड, सिकंदराबाद व मंगलोर येथे संग्रहालये स्थापन झाली.[६७]

मुंबईमधील ग्रॅंट वैद्यकीय महाविद्यालयात इ.स. १८४५ मध्ये वैद्यक संग्रहालयाची स्थापना करण्यात आली. आशियातील पहिले वैद्यक संग्रहालय म्हणून या संग्रहालयाची गणना होते.[६८] इ.स. १८४८ मध्ये मुंबई मध्ये आणखी एक संग्रहालय स्थापन व्हावे यासाठी पुन्हा प्रयत्न चालू झाले. या प्रयत्नांना नंतरच्या काळात जोरदार पाठिंबा मिळाला व १८५१ मध्ये औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात येणार होते. याच वस्तूंचे संग्रहालय स्थापन करावे असा प्रयत्न झाला व डॉ. ब्युइस्ट यांच्या पुढाकाराने इ.स. १८५७ मध्ये 'म्युझियम

ऑफ इकॉनॉमिक प्रॉडक्टस्' हे संग्रहालय स्थापन झाले.[६९] १८५७ पर्यंत भारतात १२ संग्रहालये स्थापन झालेली होती.[७०] इ.स. १८६३ मध्ये लखनौ व नागपूर येथे मध्यवर्ती संग्रहालय स्थापन करण्यात आली तर १८६५ मध्ये 'म्हैसूर गव्हर्मेंट म्युझियम', १८७४ मध्ये मथुरा संग्रहालय, १८७५ मध्ये रायपूर संग्रहालय व १८८७ मध्ये राजकोट व बडोदा येथील संग्रहालये स्थापन झाली. [७१]

इ.स. १८८७ मध्ये इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा अर्धशत्सांवत्सरिक उत्सव साजरा करण्यात येणार होता. त्या निमित्ताने ब्रिटिश साम्राज्याच्या सर्व भागात संग्रहालये स्थापण्यासाठी प्रयत्न चालू होते. परिणामी भारतात देखील संग्रहालय स्थापनेस गती मिळाली. कारण भारतातदेखील व्हिक्टोरिया राणीचा अर्धशत्सांवत्सरिक उत्सव साजरा करण्यात आला व त्या निमित्ताने मद्रास येथे 'व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट म्युझियम' व जयपूर, उदयपूर, राजकोट, विजयवाडा इ. ठिकाणी संग्रहालये स्थापन करण्यात आली.[७२] एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भारताच्या वेगवेगळ्या भागात २६ संग्रहालये स्थान झालेली होती.[७३]

लॉर्ड कर्झनच्या (१८९९-१९०५) काळात संग्रहालय विकासास विशेष गती मिळाली. कारण कर्झनला भारताचा वैभवशाली भूतकाळ जाणून घेण्याची जिज्ञासा होती. त्यासाठी प्राचीन स्मारके सुस्थितीत ठेवणे व संग्रहालये स्थापन करणे गरजेचे वाटत होते, म्हणून कर्झनने इ.स. १९०४ मध्ये 'Ancient Monument Act' (प्राचीन स्मारक संरक्षण व भूमिगत निधी कायदा) पास करून जुन्या संस्मरणीय वास्तू व वस्तू यांचा ऱ्हास व नाश थांबवण्याचा प्रयत्न केला.[७४] खऱ्या अर्थाने लॉर्ड कर्झनने भारताला दिलेली एक देणगीच आहे. कर्झनच्या प्रयत्नामुळे बंगालमधील पागन व मंडाले, मुंबई इलाख्यातील विजापूर, आग्रामधील ताजमहल, धार आणि पेशावर या ठिकाणी संग्रहालये स्थापन झाली.[७५]

लॉर्ड कर्झनप्रमाणेच पुरातत्व सर्वेक्षण खात्याचे सर संचालक सर जॉन मार्शल (१८७६-१९५८) यांनी देखील संग्रहालय स्थापनेत विशेष उत्साह दाखवला.कारण इ.स. १९०२ नंतर क्रमशः अनेक उत्खननाच्या माध्यमातून गोळा झालेल्या पुरातण अवशेषांचे संरक्षण व

प्रदर्शन करण्यासाठी निरनिराळ्या पुरातत्वीय स्थल संग्रहालयाची निर्मिती केली. यामध्ये काही पुरातत्व खात्याने तर काही त्यांच्या प्रोत्साहनाने झाली. यामधील अजमेर, बारीबाडा, चंबा, जोधपूर, खजुराहो, ग्वाल्हेर व ढाका आणि 'सेंट्रल एशियन ॲन्टिक्विटीज म्युझियम', नवी दिल्ली ही संग्रहालये सर जॉन मार्शल यांच्या प्रयत्नामुळे स्थापन झाली.[७६]

मुंबईमध्ये इ.स. १८९२ पासून पुन्हा संग्रहालय स्थापनेचे प्रयत्न चालू झाले. त्यामुळे इ.स. १९०४ मध्ये सरकारने यासाठी एक समिती नेमली. या समितीने सरकार व श्री. करीमभाई इब्राहिम यांच्याकडून अनुदान व देणगी मिळवून इ.स. १९१४ मध्ये संग्रहालयासाठी इमारत बांधली. मात्र ही इमारत पहिल्या महायुद्ध काळात (१९१४-१९१९) तात्पुरती लष्करी रुग्णालयासाठी देण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्षात हे संग्रहालय इ.स. १९२१ मध्ये सुरु करण्यात आले. (सध्याचे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम) प्रथम या संग्रहालयात सर रतन टाटा, सर दोराब टाटा व सर अकबर हैदरी यांच्याकडून भेट मिळालेल्या वस्तू व 'रॉयल एशियाटीक सोसायटी'ची मुंबई शाखा व 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोयायटी' यांनी संग्रहीत केलेल्या वस्तू ठेवण्यात आल्या होत्या.'[७७]

डॉ. जे.पी. वोगल हे सन १९११ मध्ये पुरातत्व खात्याचे सर संचालक म्हणून काम करीत होते. संग्रहालयाविषयी त्यांना विशेष आस्था व उत्साह वाटत असल्यामुळे संग्रहालय विकासास मदत झाली. इ.स. १९११ मध्ये संग्रहालय अधिवेशन झाले. या अधिवेशनात डॉ. वोगल यांनी भारतात अस्तित्त्वात असलेल्या ३९ संग्रहालयांचा अहवाल सादर केला.[७८] इ.स.१९२१ नंतर भारतात अनेक ठिकाणी संग्रहालये स्थापन झाली. यामध्ये इंदोर, हैद्राबाद, हमितनगर, जामनगर, पद्मनापुरम व रेफ येथील संग्रहालयाचा समावेश होता.[७९] सन १९३६ पर्यंत भारताच्या विविध भागामध्ये संग्रहालयाची संख्या १०५ पर्यंत पोहोचली होती. या १०५ संग्रहालयापैकी ३६ संग्रहालये केंद्र व प्रांतीय सरकारच्या निमंत्रणाखाली होती. तर २७ संग्रहालये महाविद्यालय व विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली होती. २७ संग्रहालये भारतातील विविध संस्थानाकडून चालविली जात

होती. तर १४ संग्रहालये नगरपालिकाकडून चालवली जात होती. मात्र या सर्व संग्रहालयापैकी ३१ संग्रलाये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सरकारच्या नियंत्रणाखाली होती.[८०]

भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खाते व अन्य काही संस्थानी प्राचीन ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन व्हावा यासाठी प्रयत्न केले. परिणामी भारताच्या कांही शहरामध्ये संग्रहालये स्थापन होण्यास मदत झाली.[८१] भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संग्रहालये स्थापन करण्याची व त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज वाटत होती. त्यामुळेच भारताच्या संविधानामध्ये देखील राज्य सरकारांनी संग्रहालये स्थापनेस व त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे अशी तरतूद केलेली आहे.[८२] स्वातंत्र्योत्तरच्या दोन दशकामध्ये मुख्यत्वे पुरातत्व वस्तुसंग्रहालये स्थापन झाली. यामध्ये खालील संग्रहालयांचा समावेश होता. नागार्जून कोंडा (१९४९), अमरावती (१९५१), कोण्डापूर (१९५२), गोवा (१९६१), कोणार्क (१९६६) इ. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील सर्व संस्थानाचे विलिनीकरण झाले. त्यामुळे सरकारकडून मिळणारे तनखे (Priry Purses) बंद झाले. परिणामी संस्थानिकांची फारच कुचंबणा झाली. त्यामुळे त्यांनी स्वतःकडील राजप्रसादांचे रुपांतर एकतर हॉटेलमध्ये केले अथवा वस्तुसंग्रहालयात केल्याने संग्रहालय विकासास हातभार लागला.[८३] संस्थानिकांनी स्थापन केलेल्या संग्रहालयात 'महाराजा फत्तेसिंग म्युझियम' बडोदा, 'महाराजा उदयपूर म्युझियम' उदयपूर, 'महाराजा जयपूर म्युझियम' जयपूर, 'महाराजा बनारस विद्या मंदिर म्युझियम रानगर फोर्ट' वाराणसी इ. वस्तु संग्रहालयाचा समावेश होता.[८४] इ.स. १९८० मध्ये भारतातील विविध राज्यामध्ये वस्तुसंग्रहालयांची संख्या चारशे इतकी होती.[८५]

**भारतातील वस्तुसंग्रहालयाचे प्रकार :** भारतामध्ये अनेक प्रकारची संग्रहालये पहावयास मिळतात. या संग्रहालयाचे विशिष्ठ तत्त्वानुसार वर्गीकरण केले जाते. यामध्ये - अ) वस्तूना प्राधान्य देऊन केलेले वर्गीकरण ब) निर्मितीचा उद्देश लक्षात घेऊन केलेले वर्गीकरण.''[८६] अशा प्रकारे संगहालयातील संग्रहीत वस्तू व संग्रहालय उभारणीचा उद्देश या आधारावर संग्रहालयाचे खालील प्रकार दिसून येतात.

**ऐतिहासिक वस्तुसंग्रहालये :** ऐतिहासिक वस्तु संगहालयात कालक्रमानुसार वस्तूंची मांडणी केलेली असते की, जेणे करून पर्यटकास किंवा अभ्यासकास प्राचीन इतिहासापासून ते आधुनिक इतिहासापर्यंत ज्ञानप्राप्त करता येईल. एखाद्या देशाचा इतिहास सांगावयाचा झाल्यास वरील पद्धतीनुसार तो दाखवता येतो. युरोपमधील प्रगत देशामध्ये अशा प्रकारची संगहालये पहावयास मिळतात. अशा प्रकारच्या संगहालयामध्ये प्राकृतिक इतिहास आणि भूगोल यांचा समावेश असतो. प्रतिकृती, नकाशे, निवासस्थाने, प्राचीन इमारतीच्या प्रतीकृती, चित्रे, ऐतिहासिक चिन्हे या माध्यमाद्वारे इतिहास विषयक चित्रण उभे केले जाते. याशिवाय पुरातत्वीय स्थळे, ऐतिहासिक स्मारके, युद्धभूमी आणि व्यक्ती यांच्या आठवणी म्हणून या संगहालयांची उभारणी केली जाते.[८७]

१) नॅशनल हेरीटैज प्रिर्झवेशन सोसायटी म्युझियम, बुंधी, राजस्थान.

२) नॅचरल हिस्ट्री म्युझियम, त्रिवेंद्रम, केरळ.

३) नॅचरल हिस्ट्री म्युझियम,दार्जिलिंग, प.बंगाल.[८८]

**पुरातत्व वस्तुसंग्रहालये:** सर जॉन मार्शल, लॉर्ड कर्झन, जनरल कॅनिगहॅम यांच्या प्रयत्नामुळे पुराणवस्तू संग्रहालये अस्तित्वात आली व त्यांचा विकास झाला. अशा संग्रहालयात प्रामुख्याने गवेषणात (उत्खनन) मिळालेल्या पुरावशेषांचा समावेश असतो. यात प्राचीन काळातील अवशेष, दगडी हत्यारे, मणी, नाणी, शिलालेख, ताम्रपट, ताडपत्रावरील ग्रंथ, प्राचीन शिल्पाकृती इ. द्वारे संग्रहालयातून प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडवले जाते.[८९] १९०४ साली सारनाथ या ठिकाणी उत्खनन स्थान संग्रहालय स्थापन करण्यात आले. तर नालंदा या ठिकाणी १९१७ साली उत्खनन स्थान संग्रहालय स्थापन करण्यात आले. त्यानंतर मोहेंजोदडो, हडाप्पा, तक्षशिला या ठिकाणी सर जॉन मार्शल यांच्या प्रयत्नामुळे संग्रहालये उभारण्यात आली. सारनाथ या ठिकाणचे उत्खनन स्थान संग्रहालय हे भारतातील पहिले संग्रहालय होय.[९०] अशा प्रकारची अनेक संग्रहालये भारताच्या विविध भागात आहेत.

१) आॅर्किआॅलॉजिकल म्युझियम, रेड फार्ट, दिल्ली.

२) हरियाणा प्रांतिय पुरातत्व संग्रहालय, गुरुकुल झांजर, हरयाणा.

३) आर्किऑलॉजिकल म्युझियम, अहर, राजस्थान

४) आर्किऑलॉजिकल म्युझियम, जालबार, राजस्थान

५) आर्किऑलॉजिकल म्युझियम, अंबर, राजस्थान

६) म्युझियम ऑफ अन्टिक्विटिज, जामनगर, गुजरात

७) बारटोन म्युझियम ऑफ अन्टिक्विटिज, भावनगर, गुजरात.

८) आर्किऑलॉजिकल म्युझियम, खजुराहो, मध्यप्रदेश

९) डिस्ट्रीक आर्किऑलॉजिकल म्युझियम, बिदीशा, मध्यप्रदेश

१०) सेंट्रल आर्किऑलॉजिकल म्युझियम, इंदोर, मध्य प्रदेश

११) आर्किऑलॉजिकल म्युझियम, मथुरा, उत्तर प्रदेश

१२) आर्किऑलॉजिकल म्युझियम, मथुरा, उत्तर प्रदेश

१३) आर्किऑलॉजिकल म्युझियम, सारनाथ, उ. प्रदेश

१४) आर्किऑलॉजिकल म्युझियम, बौधगया, बिहार

१५) आर्किऑलॉजिकल म्युझियम, कोणार्क, ओरिसा

१६) आर्किऑलॉजिकल म्युझियम, नालंदा, बिहार

१७) आर्किऑलॉजिकल म्युझियम, डेक्कन कॉलेज, पुणे, महाराष्ट्र

१८) स्टेट आर्किऑलॉजिकल म्युझियम, कलकत्ता,पश्चिम बंगाल

१९) आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया म्युझियम, शिलाँग,आसाम

२०) आर्किऑलॉजिकल म्युझियम, विजापूर, कर्नाटक

२१) लोकल आर्किऑलॉजिकल म्युझियम, चित्रदुर्ग, कर्नाटक

२२) आर्किऑलॉजिकल म्युझियम, हेळीबिड, कर्नाटक

२३) आर्किऑलॉजिकल म्युझियम, अमरावती, आंध्र प्रदेश

२४) आर्किऑलॉजिकल म्युझियम, कोंडापूर, आंध्र प्रदेश

२५) आर्किऑलॉजिकल म्युझियम, नागार्जुन कोडा, आंध्र प्रदेश [११]

15134

**कला वस्तुसंग्रहालये:** कला वस्तुसंग्रहालयात चित्रकला, मूर्तीकला, नक्षीकला, औद्योगिक कला आणि आदिवासी कलांचा समावेश होतो. तसेच बऱ्याचशा संग्रहालयात प्राचीन पुरातत्वीय कला अवशेष आणि लोककलेचा समावेश असतो. संग्रहालयातील अशा प्रदर्शनातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मांडणी केलेल्या वस्तू आणि भेट देणारे प्रेक्षक यांच्यात सुसंवाद साधला जातो. किंबहुना तसा संग्रहालयाचा प्रमुख उद्देश असतो. अतिबहुमूल्य कला वस्तुबाबत संरक्षणविषयक विशेष सावधानी बाळगली जाते.[१२] अशा प्रकारची संग्रहालये भारताच्या सर्व राज्यात पहावयास मिळतात.

१) डोग्रा आर्ट गॅलरी, जम्मू
२) क्रॉप्ट म्युझियम, थापर हाऊस, न्यू दिल्ली
३) नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट, न्यू दिल्ली
४) इंटरनॅशनल डॉल्स म्युझियम, न्यू दिल्ली
५) गव्हर्मेंट म्युझियम ॲण्ड आर्ट गॅलरी, चंदीगड
६) भारतीय लोककला संग्रहालय, उदयपूर, राजस्थान
७) म्युझियम ऑफ आर्ट वल्लभविद्यानगर,गुजरात
८) भारत कला भवन (बी.एच.यू.) वाराणसी
९) बंगिय साहित्य प्रसाद चित्रशाळा, कलकत्ता, प. बंगाल
१०) बिर्ला ॲकॅडमी ऑफ आर्ट ॲण्ड कल्चर, कलकत्ता, प. बंगाल
११) कला भवन शांतिनिकेतन, कलकत्ता, प. बंगाल
१२) म्युझियम ॲण्ड आर्ट गॅलरी, बुरदाण, प. बंगाल
१३) श्री भवानी चित्र संग्रहालय, औंध, महाराष्ट्र
१४) गव्हर्मेंट म्युझियम ॲण्ड नॅशनल आर्ट गॅलरी, मद्रास, तामिळनाडू
१५) द तंजावर आर्ट गॅलरी, मद्रास, तामिळनाडू
१६) गव्हर्मेंट आर्ट गॅलरी (श्री चित्रालय), त्रिवेंद्रम,केरळ
१७) कला अकादमी, पणजी, गोवा.[१३]

**विज्ञान आणि संशोधन संस्था वस्तुसंग्रहालये:** या प्रकारातील संग्रहालयाच्या माध्यमातून मानवाने लावलेले शोध व उन्नतीची माहिती मिळते. तंत्रज्ञानाच्या विकासात प्रत्येक व्यक्तीचा काहीना काही सहभाग असतो. तो यामधून दाखवला जातो. मानवी आणि नैसर्गिक प्रगतीचे सत्यज्ञान हे संग्रहालय प्रतिपादीत करते. अशा प्रकारचे संग्रहालय प्रथम पॅरिसमध्ये स्थापित केले गेले.[९४] विशिष्ट विषयाच्या अभ्यासासाठी तसेच जनतेत ज्ञान प्रसार होण्यासाठी विविध प्रकारची उपकरणे आणि मनोरंजक व बोधप्रद वस्तूनी सुसज्ज अशा विज्ञान संग्रहालयाची गरज बऱ्याच वर्षापासून भासत आहे. त्यामुळे अनेक देशातून अशा प्रकारची संग्रहालये निर्माण करण्यात आली आहेत. भारतामध्ये दिल्ली येथील राष्ट्रीय विज्ञान प्रयोगशाळा या संस्थेत पहिले विज्ञान संग्रहालय सुरु करण्यात आले.[९५] विज्ञान संग्रहालये ही सर्व समाजाच्या ज्ञानार्जनाच्या उपयोगाची वास्तू असल्यामुळे विज्ञान वस्तुसंग्रहालयाचा प्रकार विशेषत: विसाव्या शतकात महत्त्वाचा बनला आहे. अशा प्रकारची संग्रहालये भारताच्या काही राज्यामध्ये स्थापन झालेली आहेत.

१) म्युझियम ऑफ ऑडिवो-व्हिज्यूअल, न्यू दिल्ली

२) सायन्स म्युझियम, न्यू दिल्ली

३) ट्राईबल रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, चिंदवाडा, मध्यप्रदेश

४) म्युझियम ऑफ ॲनिमल हजबंड्री ॲण्ड व्हेटर्नशी सायन्स, गुवाहाटी,आसाम

५) ट्राईबल रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, भुबनेश्वर, ओरिसा

६) बिहार ट्राईबल रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, रांची, बिहार

७) हिमाचल माऊंटनिरींग इन्स्टिट्यूट म्युझियम, दार्जिलिंग, प. बंगाल

८) बिरबल सहानी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिवो बॉटनी म्युझियम, लहानक, उ.प्रदेश

९) प्रॉव्हिशनल हॉजिन इन्स्टिट्यूट म्युझियम, लखनऊ, उ.प्रदेश

१०) हेरास इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन हिस्ट्री ॲण्ड कल्चर, मुंबई, महाराष्ट्र

११) राजवाडे संशोधन मंडळ संग्रहालय, धुळे, महाराष्ट्र

१२) विश्वेश्वरया इंडस्ट्रियल ॲण्ड टेक्नॉलॉजी म्युझियम,बंगलोर, कर्नाटक

१३) हेल्थ म्युझियम, हैद्राबाद, आंध्रप्रदेश

१४) सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च स्टेशन रेफन्स म्युझियम, मंडपम कॅम्प, तामिळनाडू

१५) म्युझियम ऑफ द सेंट्रल ग्लास ॲण्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिटयूट कलकत्ता, प.बंगाल [९६]

**औद्योगिक वस्तुसंग्रहालये:** शास्त्रीय वस्तुसंग्रहालयामध्ये शास्त्रीय क्षेत्रात झालेली प्रगती दर्शवतात. त्या शास्त्रीय शोधाचे प्रत्यक्ष व्यवहारामध्ये जे रुपांतर होते किंवा ज्याला 'Application of Science' असे म्हणतात. अशा संग्रहालयामधून शास्त्रीय संशोधनाचा उपयोग प्रत्यक्षात कोणत्या उद्योगामध्ये कशा पद्धतीने केला आहे याचे दिग्दर्शन या ठिकाणी घडते.[९७] भारतामध्ये औद्योगिक संग्रहालयाची सुरुवात पुण्यामध्ये १८८८ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र औद्योगिक वस्तुसंग्रहालयाने झाली. (सध्याचे महात्मा फुले संग्रहालय) भारतीय कला वस्तू व कारखान्यात निर्माण झालेल्या वस्तू यांचे पुण्यात जे प्रदर्शन भरविण्यात आले होते त्यातूनच हे संग्रहालय स्थापन झाले.[९८]

१) परमनंट इक्झिबिशन ऑफ बिल्डिंग मटैरियल, निरमनभवन, न्यू दिल्ली

२) हॉयवे म्युझियम, ट्रान्सपोर्ट भवन, न्यू दिल्ली

३) कॅलिको म्युझियम ऑफ टेक्स्टाईल, अहमदाबाद, गुजरात

४) गव्हर्मेंट इंडस्ट्रियल ॲण्ड कमर्शियल म्युझियम, कलकत्ता, प.बंगाल

५) म्युझियम ऑफ द सेंट्रल ग्लास ॲण्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिटयूट, कलकत्ता, प. बंगाल.

६) कॉटेज इंडस्ट्रिज म्युझियम, गुवाहाटी, आसाम

७) महात्मा फुले औद्योगिक संग्रहालय, पुणे, महाराष्ट्र

८) टाटा संग्रहालय, पुणे, महाराष्ट्र

९) सेंट्रल इंडस्ट्रियल म्युझियम, मद्रास, तामिळनाडू [९९]

**वैद्यक वस्तुसंग्रहालये:** वैद्यक वस्तुसंग्रहालयामध्ये वेगवेगळ्या व्याधीवरील औषधे, वनस्पती, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र, औषधविज्ञानशास्त्र, पशु-पक्षी व मानवी शरीराचे विविध अवयव, अशा विविध वस्तूचासमावेश असतो. वैद्यकशास्त्रात झालेला आमूलाग्र बदल या संग्रहालयातून पहावयास मिळतो. भारतात अशा प्रकारचे संग्रहालय इ.स. १८४५ मध्ये मुंबईच्या 'ग्रँट मेडिकल कॉलेज' मध्ये स्थापन झाले. तर इ.स. १९२५ मध्ये 'स्टॅन्ले मेडिकल कॉलेज'मध्ये रोगनिदान संग्रहालय, 'सेठ गोवर्धनदास सुदरदास मेडिकल कॉलेज' मध्ये शरीररचना शास्त्र व रोगनिदान संग्रहालय स्थापन करण्यात आले. त्याबरोबर तुगलकाबाद, नवी दिल्ली या ठिकाणी औषधांचा इतिहास व वैद्यकीये संग्रहालये स्थापन करण्यात आली.[१००]

**बाल वस्तुसंग्रहालये:** मुले ही देशाची भविष्यकाळातील नागरिक असतात, म्हणून त्यांच्याकडे विशेष लक्ष देऊन ती भविष्यात आदर्श व जबाबदार नागरिक बनण्याच्या दृष्टीने बाल वस्तुसंग्रहालये महत्त्वाची असतात. यामध्ये थोर व्यक्तीचे चित्रण, विज्ञान विषयक प्रदर्शन व अन्य कला-कसुरीच्या वस्तू, हस्तकला, चित्रकला ते पाहू शकतात. त्यामधून त्यांची शैक्षणिक दृष्टिकोणातून जडण-घडण होत असते.[१०१] वैज्ञानिक तत्वे, सृष्टी विज्ञानविषयक प्रश्न, गति, गुरुत्वाकर्षण, जिव विकास व नाश या संबंधीचे अबाधित नियम, कला व विद्या, इतिहास व संस्कृति यासंबंधी माहिती मिळते. तक्ते इत्यादीच्या साह्याने सोप्या परंतु मार्मिक पद्धतीने माहिती लहान मुलांना करून देणारी वस्तुसंग्रहालये अलिकडे निर्माण होऊ लागली आहेत. अमरिली येथील बालसंग्रहालय श्री पी.जी. मेहता यांनी स्थापन केले. त्यानंतर श्री. सी.बी. गुप्ता यांच्या प्रयत्नामुळे लखनौ येथे १९६७ साली मोतीलाल नेहरु बाल संग्रहालयाची स्थापना झाली.[१०२] नवी दिल्ली येथे 'नॅशनल चिल्ड्रन म्युझियम'ची स्थापना केलेली आहे.[१०३]

**मंदिर व किल्ला वस्तुसंग्रहालये:** मंदिरे किंवा किल्ला स्थापत्य इतिहासाविषयी यथार्थ दर्शन घडवते. मंदिरे, चर्च, मठ, आश्रम व किल्ले इ. ठिकाणी धार्मिक वस्तू ठेवलेल्या असतात. त्यामुळे या ठिकाणी विशिष्ठ प्रकारच्या वस्तूंचा संग्रह

झालेला असतो. यातून अशा प्रकारच्या संग्रहालयाचा विकास झाला. दक्षिण भारतात अशा प्रकारची वस्तुसंग्रहालये निर्माण झालेली आहेत. ही संग्रहालये म्हणजे मोठमोठ्या मंदिरातील छोटी परंतु मनोरंजक संग्रहालये आहेत. भारतातील मंदिरे ही स्थानिक लोकांच्या धार्मिक गरजा पुरविणारी अशी एक संस्था आहे.[१०४] भारतातील पहिले मंदिर संग्रहालय तंजावर येथील ब्रहद्वीश्वर मंदिरातील 'राजराजा संग्रहालय' या नावाने स्थापन झाले. त्याचप्रमाणे श्रीरंगम मंदिरातील संग्रहालय, मदुराई येथील मीनाक्षी-सुंदरेश्वर मंदिरातील संग्रहालय ही विशेष उल्लेखनिय आहेत.[१०५]

१) सेंट्रल शिख म्युझियम, अमृतसर, पंजाब.
२) बिर्ला म्युझियम, बिर्ला टेंपल, भोपाळ,मध्यप्रदेश
३) दिगंबर जैन म्युझियम, सोंगीर, मध्यप्रदेश
४) श्री. वेकटेश्वरा म्युझियम, तिरुपती, आंध्रप्रदेश
५) श्री मिनाक्षी सुंदरेश्वर टेंपल म्युझियम, मदुराई, तमिळनाडू
६) फोर्ट सेंट जॉर्ज म्युझियम, मद्रास, तमिळनाडू
७) पोर्ट सेंट जॉर्ज म्युझियम,मद्रास, तमिळनाडू [१०६]

**सृष्टीविज्ञान वस्तुसंग्रहालये:** इतिहास संशोधन मंडळांनी ज्याप्रमाणे इतिहास व पुराणविषयक संग्रहालये स्थापन केली आहेत. त्याप्रमाणे सृष्टी विज्ञान मंडळांनी सृष्टीविज्ञान विभागाचे प्रयत्नपूर्वक संशोधन केले आहे. तसेच स्वतंत्र अशी सृष्टी विज्ञान संग्रहालये देखील स्थापन केली आहेत. मुंबई येथील 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम'च्या सृष्टी-विज्ञान विभागात नैसर्गिक देखाव्याची हुबेहुब दर्शन घडविणारी उत्कृष्ठ आभासचित्रे ठेवलेली आहेत. भारतीय संग्रहालयातून आढळून येणाऱ्या अशा आभास चित्रांचे हे सर्वोत्कृष्ठ नमुने आहेत. १८७२ साली अर्नाकुलम येथील महाराजा महाविद्यालयात व प्राणिशास्त्र व वनस्पतीशास्त्र विषयक सृष्टी-विज्ञान संग्रहालय स्थापन झाले. त्यानंतर १८८५ साली 'मद्रास ख्रिश्चन कॉलेज'मध्ये प्राणिशास्त्र विभागाचे सृष्टी संग्रहालय सुरु झाले.[१०७]

**वन आणि कृषि वस्तुसंग्रहालये:** अशा प्रकारच्या वस्तुसंग्रहालयातून जंगलातील विविध वनस्पती, झाडाचे प्रकार, वन्यजीवन, पशुपक्षी व शेतीशी निगडीत उपकरणे, औजारे, बि-बियाणे, कीटकशास्त्र, तंत्रज्ञानामुळे शेती व्यवसायात झालेली प्रगती व विविध शेती मालाचे प्रदर्शन या संग्रहालयातून होते. डेहराडून येथील वन महाविद्यालयाशी संलग्न असेलेला एक उत्कृष्ठ वस्तुसंग्रहालय समूह इ.स. १८७८ मध्ये स्थापन केला. हे संग्रहालय भारतातच नव्हे तर आशिया खंडात सर्वोत्तम आहे. कोइबत्तूर येथे श्री. एच्.ए. गास यांच्या प्रयत्नामुळे इ.स. १९०२ मध्ये गास वन संग्रहालय स्थापन झाले.[१०८]

१) आसाम फॉरेस्ट म्युझियम, गुवाहाटी, आसाम
२) फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, डेहराडून, उत्तरप्रदेश
३) फॉरेस्ट स्कूल म्युझियम, शिवपूर, म.प्रदेश.
४) गास फॉरेस्ट म्युझियम, कोंईबंतूर, तमिळनाडू [१०९]

**संरक्षण वस्तुसंग्रहालये:** आपल्या भूमीचे व संपत्तीचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्ये आहे. संरक्षण विषयक साधने कशी बनवली जातात, त्यात झालेली प्रगती या प्रकारचे ज्ञान अशा संग्रहालयातून मिळते. प्राचीन काळापासून मानव वेगवेगळ्या हत्यारांचा वापर करत आलेला आहे. आजच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे शस्त्रास्त्रामध्ये आमूलाग्र स्वरुपाचा बदल घडून आलेला आहे. या बदलाचे दर्शन या प्रकारच्या संग्रहालयातून होते. यामध्ये हत्याराचे विविध प्रकार, त्यात झालेला विकास व आधुनिक पद्धतीची शस्त्रास्त्रे पाहावयास मिळतात.

१) एअर फोर्स म्युझियम, पालम, न्यू दिल्ली.
२) सेंट्रल पोलिस म्युझियम, आर.के. पूरम, न्यू दिल्ली.
३) नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी म्युझियम, खडकवासला, पुणे ,महाराष्ट्र.[११०]

**विद्यापीठ, महाविद्यालय व शैक्षणिक संग्रहालये :** भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालये व शाळामधून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. प्रयोग, प्रात्यक्षिक, दृक-श्राव्य इ. साधनांचा वापर शिक्षणामध्ये होतो. या दृष्टिकोणातून अनेक संग्रहालये अस्तित्त्वात आली. कारण विद्यार्थी अनुभवातून लवकर ज्ञान अवगत करतो. लहान मुलांना शिक्षण देण्याचे हे प्रभावी माध्यम आहे. अशा प्रकारचे पहिले संग्रहालय राज्य पुरातत्व विभाग म्हैसूर यांनी म्हैसूर विद्यापीठात स्थापन केले. तथापि, ज्यास सर्वस्वी विद्यापीठ संग्रहालय म्हणता येईल असे संग्रहालय कलकत्ता विद्यापीठात अस्तित्त्वात आले. त्यानंतर अलाहाबाद विद्यापीठ, गुरुकुल विद्यापीठ, हरिद्वार बनारस इ. ठिकाणी संग्रहालये स्थापन करण्यात आली. अशा प्रकारची संग्रहालये अनेक शाळा व महाविद्यालयामध्ये देखील स्थापन झालेली आहेत.[१११]

१) लेडी हार्डींग मेडिकल कॉलेज म्युझियम, न्यू दिल्ली

२) अॅंथ्रोपॉलॉजी म्युझियम, पंजाब युनिव्हर्सिटी, चंदीगड

३) जिऑलॉजी अॅण्ड जिऑग्राफी म्युझियम, पंजाब युनिर्व्हसिटी, चंदीगड

४) म्युझियम ऑफ द युनिव्हर्सिटी डिपाटमेंट ऑफ अर्किलॉजी, बडोदा, गुजरात

५) र्आकिऑलॉजिकल म्युझियम, युनिव्हर्सिटी ऑफ सागर, सागर, म. प्रदेश

६) अँथ्रोपॉलॉजिकल म्युझियम, लखनऊ युनिव्हर्सिटी, लखनऊ,उ.प्रदेश

७) कौशाबी म्युझियम, अलाहाबाद युनिव्हर्सिटी, अलाहाबाद,उ. प्रदेश

८) डिस्ट्रीक एज्यूकेशन म्युझियम, बुलंदशहर, उ. प्रदेश

९) डिस्ट्रीक एज्यूकेशन म्युझियम, देवोरीया,उ. प्रदेश

१०) डिस्ट्रीक एज्यूकेशन म्युझियम, मुज्जफरनगर, उ. प्रदेश

११) म्युझियम ऑफ सायन्स अॅण्ड कल्चर, अलिगढ, मुस्लिम युनिव्हर्सिटी, उ.प्रदेश

१२) अँथ्रोपॉलॉजी म्युझियम, रांची युनिव्हर्सिटी, रांची, बिहार

१३) अँथ्रोपॉलॉजी म्युझियम, गुवाहाटी युनिव्हर्सिटी, आसाम

१४) अॅंथ्रोपॉजिकल म्युझियम, युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, प.बंगाल

१५) अशुतोष म्युझियम ऑफ इंडियन आर्ट, युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, प.बंगाल.

१६) डेक्कन कॉलेज म्युझियम, पुणे, महाराष्ट्र

१७) आर्मड फोर्सेस मेडिकल कॉलेज म्युझियम, पुणे, महाराष्ट्र

१८) गुजरात विद्यापीठ म्युझियम, अहमदाबाद, गुजरात

१९) आंध्र मेडिकल कॉलेज म्युझियम, विशाखापट्टणम, आंध्रप्रदेश

२०) मंडनापल्ले कॉलेज म्युझियम, गुंठर, आंध्रप्रदेश

२१) झूलॉजी अॅण्ड बॉटनी म्युझियम, महाराजा कॉलेज, इरनाकुलम, केरळ [११२]

**स्थापत्य वस्तुसंग्रहालये:** स्थापत्य संग्रहालये ही इतर संग्रहालयापेक्षा अनोखी असतात. यामध्ये इमारतीच्या बांधकामासाठी लागणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन केलेले असते. यामधून इमारती बांधणीचे तंत्र व शिक्षण अवगत होते. त्याचबरोबर बांधकाम तंत्रज्ञानात झालेली प्रगती दर्शविण्यात येते. बांधकामाकरीता कमीत कमी जागेचा जास्तीत जास्त वापर कसा करावा, इमारतीच्या प्रतिकृती, साहित्याचे नमुने व स्थापत्यशास्त्र विषयक माहिती यामध्ये प्रदर्शित करण्यात आलेली असते. अशा प्रकारचे पहिले संग्रहालय मद्रासजवळ गिंडी येथील स्थापत्य महाविद्यालयात स्थापन करण्यात आले. यामध्ये अध्यापनासाठी अत्यावश्यक असलेले शेकडो सुंदर नमुने ठेवलेले होते. नंतरच्या काळात राष्ट्रीय इमारती संघटन प्रदर्शन केंद्र निर्माण भवन, नवी दिल्ली या ठिकाणी स्थापन करण्यात आले.[११३]

**राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये:** राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये ही केंद्र शासनाच्या अधिनस्त आहेत. याशिवाय केंद्र शासनाची काही पुरातत्वीय स्थळ संग्रहालये सुद्धा आहेत. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय हे भारताचे सांस्कृतिक वारसा जपणारे प्रमुख केंद्र आहे. या संग्रहालयातून संपूर्ण भारताचे सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि अन्य बाबीचे दर्शन

घडते. या संग्रहालयाची स्थापना इ.स. १९४५ मध्ये केंद्र सरकारने केली. प्रथम ते राष्ट्रपती भवनातील एका भागात होते. नंतर ते १९६० साली नवीन इमारतीत मांडण्यात आले. हे वस्तुसंग्रहालय विविध भागातील विद्या कलांचे प्रतिनिधित्व करते. म्हणून ते राष्ट्रीय संग्रहालय संबोधले जाते.[११४]

१) नॅशनल आर्ट गॅलरी, न्यू दिल्ली.

२) नॅशनल स्पोर्ट म्युझियम, पतियाळ, पंजाब.[११५]

**मध्यवर्ती व स्थानिक वस्तुसंग्रहालये:** मध्यवर्ती व स्थानिक संग्रहालयात त्या-त्या भागातील पुरातन अवशेष, इतिहास, कला, शिल्प, मानववंशशास्त्र, निसर्ग इतिहास इ. प्रकारच्या त्या प्रदेशातील वस्तुचा संग्रह केलेला असतो. अशा संग्रहालयातून त्या प्रदेशाचे सांस्कृतिक दर्शन घडविले जाते. भारतामध्ये त्या त्या राज्यांच्या विशिष्ठतेनुसार स्थानिक व जिल्हा पातळीवर, नगरपालिका, महानगरपलिका व स्वायत्त संस्था यांच्याकडून देखील स्थानिक संस्कृतीचे व ऐतिहासिक कला वस्तूंचे दर्शन व्हावे या हेतूने स्थानिक पातळीवर संग्रहालये स्थापलेली दिसतात.[११६]

१) एस्.पी.एस्. गव्हर्मेंट म्युझियम, श्रीनगर

२) सेंट्रल म्युझियम, जयपूर, राजस्थान

३) सेंट्रल म्युझियम, पिलानी, राजस्थान

४) गव्हर्मेंट म्युझियम, अलवार, पंजाब

५) स्टेट म्युझियम, भारतपूर, पंजाब

६) स्टेट म्युझियम माऊंट, अबू, पंजाब

७) कच्छ म्युझियम, भूज, गुजरात

८) सेंट्रल म्युझियम, इंदोर, म.प्रदेश

९) सेंट्रल म्युझियम, भोपाळ, म.प्रदेश

१०) धार डिस्ट्रीक म्युझियम, धार, म.प्रदेश

११) संचिधिया म्युझियम,ग्वाल्हेर, म.प्रदेश

१२) स्टेट म्युझियम, डाडवेला, म.प्रदेश

१३) स्टेट म्युझियम, जमूनाबाग, ग्वाल्हेर

१४) तुलशी संग्रहालय, सतना, म.प्रदेश

१५) गया म्युझियम, गया, बिहार

१६) पटना म्युझियम, पटना, बिहार

१७) वैशाली म्युझियम, वैशाली, बिहार

१८) बारीपाडा संग्रहालय, बारीपाडा, ओरिसा

१९) खचिंग म्युझियम, खचिंग, ओरिसा

२०) ओरिसा स्टेट म्युझियम, भाऊबनेखर, ओरिसा

२१) मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर, महाराष्ट्र

२२) स्टेट म्युझियम, सिमला, हिमाचल प्रदेश [११७]

**स्मारक वस्तुसंग्रहालये:** स्मारक म्हणजे एखाद्या थोर व्यक्तीच्या आठवणी सतत राहाण्यात, त्या व्यक्तीच्या कार्याचा यथोचित सन्मान व्हावा व त्यांच्या जीवनातील विविध पैलूंचे दर्शन व्हावे या दृष्टिकोणातून अशा प्रकारच्या संग्रहालयाची निर्मिती केलेली दिसते. या संग्रहालयातून अनेकाना प्रेरणेचा स्त्रोत मिळत असतो. थोर व्यक्तीचे कार्य हे दिपस्तंभाप्रमाणे असते. ते सतत आपणास प्ररेणा देते.[११८] त्याचबरोबर काही हौशी लोकांनी अनेक चिज वस्तू जमवलेल्या असतात. त्यांच्या नावाने देखील काही संग्रहालये स्थापन झालेली आहेत.

१) गांधी स्मारक संग्रहालय, राजघाट, न्यू दिल्ली

२) इंडियन वॉर मेमोरियन म्युझियम, न्यू दिल्ली

३) नेहरु मेमोरियल म्युझियम, दिल्ली

४) महाराजा फत्तेसिंह म्युझियम, बडोदा, गुजरात

५) गांधी स्मारक संग्रहालय, भावनगर, गुजरात

६) गांधी स्मारक संग्रहालय, साबरमती, गुजरात

७) प्रभास पटाण म्युझियम, प्रभास पटाण, गुजरात

८) सरदार व्ही पटेल म्युझियम, सुरत, गुजरात

९) वॉटसन म्युझियम, राजकोट, गुजरात

१०) गंगा गोल्डन ज्यूबली म्युझियम, बिकानेर, राजस्थान

११) छोटूराम म्युझियम, संगाटीया, राजस्थान

१२) राणा प्रताप म्युझियम, उदयपूर, राजस्थान

१३) सरदार म्युझियम, जोधपूर, राजस्थान

१४) महाराजा जिवाजीराव शिंदीया संग्रहालय, ग्वाल्हेर, मध्यपदेश.

१५) बिहार गांधी स्मारक संग्रहालय, पटणा, बिहार

१६) महात्मा गांधी हिंदी संग्रहालय, काल्पी, उ. प्रदेश

१७) गांधी स्मारक संग्रहालय, बराकचूर , पं.बंगाल

१८) हरप्रसाद शास्त्री म्युझियम, संस्कृत कॉलेज, कलकत्ता, प.बंगाल

१९) नेताजी म्युझियम, कलकत्ता, प.बंगाल

२०) रविंद्र भारती म्युझियम, कलकत्ता, प.बंगाल

२१) व्हिक्टोरिया मेमोरियल म्युझियम, कलकत्ता, प.बंगाल

२२) विद्यासागर स्मृतीभवन संग्रहालय, मदनापूर, प.बंगाल

२३) कर्वे स्मारक संग्रहालय, पुणे, महाराष्ट्र

२४) छ. शहाजी म्युझियम, कोल्हापूर, महाराष्ट्र

२५) सालारजंग म्युझियम, हैद्राबाद, आंध्रप्रदेश

२६) व्हिक्टोरिया ज्यूबली म्युझियम, विजयवाडा, आंध्रप्रदेश

२७) भूरीसिंग म्युझियम, चंम्भा, हिमाचल प्रदेश

२८) गांधी स्मारक संग्रहालय, मदुराई, तमिळनाडू


२९) टिपू सुलतान म्युझियम, श्रीरंगपट्टणम, तमिळनाडू

३०) व्हिक्टोरिया सुवर्ण महोत्सव संग्रहालय, विजयवाडा, आंधप्रदेश

३१) गांधीस्मारक संग्रहालय, मदुराई, तमिळनाडू

३२) टिपू सुलतान संग्रहालय, श्रीरंगम, तमिळनाडू [११९]

भारतातील विविध राज्यामध्ये दहा संग्रहालयापेक्षा जास्त संग्रहालये असलेली राज्य खालीलप्रमाणे आहेत.




(संदर्भ : बक्षी एस्.जे.,डिव्हाईव्हेडी व्ही.पा., मॉडर्न म्युझियम्स, न्यू दिल्ली, १९७३)

वरील आकडेवारीवरून असे दिसून यते की, ज्या राज्यामध्ये सुरुवातीस ब्रिटिश सत्तेचा अंमल प्रस्थापित झाला, पुरातत्वीय खात्याने व उत्खनने केली, तरीय स्वातंत्र्य चळवळीची केंद्र होती, ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली राज्ये व शैक्षणिक विकास ज्या राज्यात झपाट्याने झाला त्या राज्यामध्ये संग्रहालयांचा विस्तार झालेला आहे. जी राज्ये दुर्गम भागात आहेत त्या राज्यात संग्रहालय विकास झालेला नाही व बाकी राज्यात संग्रहालयांची संख्या अत्यल्प आहे.

**निष्कर्ष :**

मानव मानसिकदृष्ट्या समाजप्रिय व संग्रहप्रिय प्राणी आहे. प्रथम तो अन्नाच्या शोधासाठी भटकत होता, नंतरच्या काळात त्याचा संग्रह करू लागला. यातूनच त्याची संग्रह करण्याची प्रवृत्ती विकसित होत गेली. पुढे हत्यारे, प्राणी निसर्गातील चमत्कारिक वस्तूंचा तो संग्रह करू लागला. यातून संग्रहालय संकल्पनेचा उदय होण्यास मदत झाली व त्याचे महत्त्वदेखील समजू लागले. संग्रहालय हे मानवी जीवनाचे व संस्कृतीचे प्रतिबिंब दाखवणारे केंद्र व ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक भूमिका पार पाडणारी संस्था आहे. वस्तुसंग्रहालयातून उत्खनीत पुरातत्वीय वस्तू पासून ते औद्योगिक कलाकृतीपर्यंत सर्वच घटकांचा समावेश झाल्याने इतिहासलेखनाचे भौतिक साधन व इतिहासलेखनाची साह्यकारी शाखा म्हणून महत्त्व झाले. याशिवाय शैक्षणिक दृष्टिकोणातून देखील संग्रहालयाची भूमिका महत्त्वाची व उपयुक्त ठरली. त्यामुळे वस्तुसंग्रहालय (Museum) ही शास्त्रीय संज्ञा प्राप्त होवून आधुनिक स्वरुप प्राप्त झाले. मात्र सध्या आपण ज्या प्रकारचे संग्रहालयाचे स्वरुप ग्राह्य धरतो अशा प्रकारचे स्वरुप प्राचीन किंवा मध्ययुगीन काळात नव्हते. ते राजे, महाराजे व श्रीमंत व्यक्ती यांच्या पुरते मर्यादीत होते. ज्यावेळी वैचारिक, बौद्धीक व भौतिक क्षेत्रात बदल घडून आले तेव्हा संग्रहालयाचे स्वरुप विस्तृत होण्यास मदत झाली. प्राचीन भारतीय मंदिरे व विद्यापीठे संग्रहालयाची भूमिका पार पाडत होती. कारण याच्या माध्यमातून संगीत, नृत्य, शिल्पकला, चित्रकला, साहित्य ग्रंथ व इतर कलाकृतीचा विकास व संवर्धन होण्यास मदत झाली. त्यामुळे ही एक प्रकारची

संग्रहालयेच होती. प्राचीन काळातील संग्रहालयाची ही परंपरा खंडित झाली नाही तर त्याचे स्वरुप काहीसे बदलले व चित्रशाळांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. अकबरसारख्या मुघल सम्राटानी चिकारांना व चित्रकलेला प्रोत्साहन व राजाश्रय दिल्याने पुढील काळात म्हणजे जहागिराचा काळ हा चित्रकलेचा सुवर्ण काळ ठरला. ब्रिटिश सत्ता स्थिर झाल्यानंतर पाश्चिमात्य विद्वानांच्यामुळे शिक्षणाचा नवीन दृष्टिकोन तयार होऊन प्राचीन भारतीय संस्कृतीचा नव्याने अभ्यास करण्यास सुरुवात झाली. परिणामी प्राचीन दुर्मिळ वारसा जतन व संवर्धन करण्याची गरज वाटू लागली. त्यामुळे अनेक विद्वान व सेवाभावी संस्थानी संग्रहालय स्थापनेस प्रोत्साहन दिले व प्रयत्न केले. इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाच्या अर्धशत्सांवासरिक उत्सवामुळे संग्रहालय स्थापनेस चालना मिळाली. लॉर्ड कर्झनच्या काळात "Ancient Monument Act" पास झाल्याने प्राचीन ऐतिहासिक स्मारके व वस्तूचे जतन व संवर्धन होण्यास कायद्याची मतद झाली. खऱ्या अर्थाने कर्झनने भारताला दिलेली ही एक देणगीच आहे. या कायद्यामुळे संग्रहालय स्थापनेस गती मिळाली. त्यामुळे भारतात ब्रिटिश काळात खऱ्या अर्थाने विकास व विस्तार झाला. ब्रिटिश विद्धान व सरकारने दिलेले प्रोत्साहन व मदत त्यामुळे संग्रलायांचा विकास होऊन विस्तार झाला. स्वातंत्र्योत्तर काळात संग्रहालये अनेक प्रकार अस्तित्वात आले. याच्या माध्यमातून भारताचा वैभवशाली इतिहास जतन व संवर्धन होण्यास मदत झाली.

-----

## संदर्भ सूची व तळटिपा

१) बॅनजी एन्.आर., द म्युझियम अॅण्ड द एज्युकेशन सिस्टिम, व्ही.पी. डिव्हाईव्हेडी, (संपा.) म्युझियम अॅण्ड म्युझिऑलॉजी न्यू होरीजन्स, न्यू दिल्ली, पृ. १२९-३०.

२) सयाजीराव खंडेराव गायकवाड हे बडोदा संस्थानचे कर्तृत्ववान व पुरोगामी विचारसरणीचे संस्थानिक होते. बडोदा संस्थानात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी बहुमोल कार्य केले. कलेला उत्तेजन मिळावे म्हणून कलानिधी वस्तुसंग्रहालयाची स्थापना केली (मराठी विश्वचरित्र कोश, खंड पहिला पृ. ८८१)

३) गायकवाड आर.डी., सरदेसाई बी.एन्., हनमाने व्ही.एम्. इतिहास लेखन पद्धती व ऐतिहासिक स्मारकांचा अभ्यास, पृ. १६५.

४) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ. १६८.

५) राजा (दिनकर) केळकर हे पुण्यातील 'राजा दिनकर केळकर संग्रहालय' यांचे निर्माते. हे संग्रहालय त्यांनी एकट्यानी स्वप्रयत्नातून निर्माण केले. या कार्याची दखल घेऊन पुणे विद्यापीठाने 'डि.लिट' व भारत सरकारने 'पद्मश्री' हा सन्मान दिला. 'अज्ञानवासी' या टोपन नावाने त्यांच्या कविता प्रसिद्ध आहेत. (शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, पृ. ५९१).

६) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ. १६६.

७) पाटील म.प., सामाजिक शास्त्रांमधील संशोधनक्षेत्राची निवड व नवी क्षेत्रे (अप्रकाशित) या विषयावर राजर्षि शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रूकडी या ठिकाणी 'सामाजिक शास्त्रांमधील संशोधन क्षेत्राची निवड आणि संशोधन पद्धती' या एक दिवशीस कार्यशाळेसाठी केलेले मार्गदर्शन.

८) ग्रामशी हा नवमार्क्सवादी इटालियन तत्त्वज्ञ होता. 'सबाल्टर्न' ही संज्ञा त्यांनी पुढे आणली. ग्रामशीने 'प्रिझन नोटस्' या ग्रंथामध्ये 'दि नोट्स ऑन इटालियन हिस्ट्री' यामध्ये वंचितांच्या इतिहासासंबंधी 'सबाल्टर्न हिस्ट्री'ची संकल्पना मांडली. (हिस्टोरिओग्राफी, कनसेप्ट, मेथड अॅण्ड टूल्स, पृ. १८७-८८)

९) टिकेकर अरूण, (संपा.) शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, पुणे, २०००, पृ. ५.

१०) कित्ता, पृ. ५.

११) पाटील म.प., उपरोक्त.

१२) विश्वनाथ काशिनाथ राजवाडे हे एक ऋषितुल्य इतिहास संशोधक, व्याकरणाचार्य व निर्भिड भाष्यकार म्हणून त्यांची ख्याती आहे. मराठ्यांच्या इतिहासाची साधने व बावीस खंड संपादन करून प्रकाशित केले. त्यांनी भारत इतिहास संशोधन मंडळाची स्थापना केली. मराठी छंद, कादंबरी, मराठी धातुकोश, राधामाधव विलासचंम्पू, महिकावतीची बखर हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, पृ. ६२३)

१३) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ. १६८.

१४) केतकर हे महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे निर्माते व संपादक व समाजशास्त्रज्ञ होते. १९३१ च्या हैद्राबाद येथील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. 'ब्राह्मणकन्या', 'आशावादी', 'विचक्षणा', 'भटक्या' ह्या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या. (शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, पृ. ५९१).

१५) गायकवाड आर.डी., व इतर, उपरोक्त पृ. १६८.

१६) सी. शिवराममूर्ती, भारतीय संग्रहालयाची निर्देशिका, नवी दिल्ली, १९६०, पृ. ५.

१७) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., मॉडर्न म्युझियम्स, न्यू दिल्ली,१९७३,पृ. ५.

१८) बोरकर रा.रा., सावंत उत्तम, भारतीय पुरातत्वशास्त्र, नांदेड, २००४, पृ. २२८.

१९) कित्ता, पृ. २३०-३१.

२०) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त,पृ. १५७.

२१) इनस्लायकोपिडिया ब्रिटानिका, खंड पंधरावा, लंडन, १९६३, पृ. ९६७.

२२) रॉय डी.के., म्युझियम्स् अॅण्ड डिफेन्स स्टडीज इन इंडिया, पृ. ५.

२३) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त पृ. १५६.

२४) कित्ता, पृ. १५६.

२५) गायकवाड रा.ज्ञा., सरदेसाई, ऐतिहासिक स्थळे व स्मारके यांचा अभ्यास, कोल्हापूर, १९८०, पृ. ११६.

२६) ॲरिस्टाटल हा ग्रीक शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होता. प्लेटोचा तो शिष्य होता. त्यांने तर्कशास्त्र, भौतिकशास्त्र, मानसशास्त्र या विषयावर लिखाण केले. 'पोयटिक्स' हा त्याचा प्रसिद्ध ग्रंथ. 'साहित्य म्हणजे मानवी वृत्तीची अनुकृती असते' हे प्रमेय त्यांने मांडले. (मराठी विश्वचरित्र कोश, खंड पहिला, पृ. १६२-६३)

२७) अलेक्झांडर हा मॅसिडोनियाचा विश्वविख्यात सम्राट होता. त्याला राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, काव्य, कला याविषयी आवड होती. सर्वज्ञात जग ग्रीसच्या सांस्कृतिक अधिपत्याखाली एक राष्ट्र ही त्याची महत्त्वाकांक्षाहोती. इ.स.पू. ३२७ मध्ये त्यांने भारतावर आक्रमण केले होते. (मराठी विश्वचरित्र कोश, पृ. ९९-१०१)

२८) गायकवाड रा.ज्ञा. व इतर, उपरोक्त, पृ. ११७.

२९) जोशी पु.म., ग्रंथालयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, ल.वा. पडोळे, (संपा.) मराठी ग्रंथालयाचा इतिहास, नागपूर, १९५१, पृ. २१.

३०) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ. १५८.

३१) गायकवाड रा.ज्ञा. व इतर, उपरोक्त,पृ. ११७.

३२) इनस्लायकोपिडिया ब्रिटानिका, उपरोक्त, पृ. १६७-६८.

३३) कित्ता, पृ. १६८.

३४) कित्ता, पृ. १६८.

३५) गायकवाड रा.ज्ञा. व इतर, उपरोक्त, पृ. ११६-१७.

३६) इनस्लायकोपिडिया ब्रिटानिका, उपरोक्त, पृ. ९६८.

३७) जोशी महादेवशास्त्री, (संपा.), उपरोक्त,पृ. ५३६.

३८) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ. १५९.

३९) कित्ता, पृ. १६०.

४०) त्रिवेदी आर.डी., द टेंपल ॲण्ड द म्युझियम, डिव्हाईव्हेडी व्ही.पी., (संपा.) उपरोक्त,पृ. २८१.

४१) कित्ता, पृ. २८२-८३.

४२) भारतातील व जगातील बौद्ध शिक्षणाचे केंद्र म्हणून नालंदा विद्यापीठ प्रसिद्ध होते. गुप्त सम्राट समुद्रगुप्त (३३०-७५) व कुमार गुप्त (४१५-५५) यांच्या काळात याची भरभराट झाली. याचे पूर्वीचे नाव 'नलविहार' असे होते. या विद्यापीठात चिनी प्रवाशी हुएनत्संग (इ.स. ६२९-४५) व इत्सिंग (इ.स. ६७३-९५) यांनी बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी विद्यापीठास भेट दिली. तवकर ना.गो., प्राचीन भारतीय विद्यापीठे,मुंबई,१९६७,पृ. ४६,४७.

४३) जोशी महादेवशास्त्री, (संपा.) उपरोक्त, पृ. ५३६.

४४) फारशी नायक अमीर हम्जा, अर्थात हजरत मुहम्मद साहब यांच्या काकांच्या विरतापूर्ण कारनाम्याशी संबंधित अर्ध-पौराणिक 'फतासियो'ची अकबराला आवड होती. त्यामुळे त्यावर आधारीत ही चित्रे चित्रित केलेली होती. बदायुनी यांच्या मते हा चित्रसंग्रह पूर्ण होण्यासाठी पंधरा वर्षे लागली. (मध्यकालीन भारत, खंड दोन, पृ. ५११)

४५) दास अशोककुमार, मुघल चित्रकला का उद्भव और विकास, हरिशचंद्र वर्मा, (संपा.) मध्यकालीन भारत, खंड दोन, दिल्ली, पृ ५११.

४६) कित्ता, पृ. ५१६.

४७) पारखी, र.श., मराठी ग्रंथालयाची उत्पत्ती व विकास, पडोळे ल.वा., (संपा.), उपरोक्त, पृ. ५०.

४८) जयसिह हा कलाभिज्ञ व विद्याप्रेमी राजा होता. अवकाशातील निरनिराळ्या ग्रहांचा सुक्ष्म अभ्यास करण्यासाठी त्यांनी जयपूर, दिल्ली, बनारस व उज्जैयनी या ठिकाणी वेधशाळा (जंतरमंतर) बांधल्या व तंज्ञाच्या साह्याने जयप्रकाश, सम्राटयंत्र, भित्सियंत्र, वृत्तष्ठारा इ. उपकरणे तयार करून 'सिद्धात सम्राट' हा ज्योतिषशास्त्रावरील संस्कृत ग्रंथ तयार करून घेतला. (मराठी विश्वचरित्र कोश, पृ. ११८)

४९) दास अशोककुमार, राजस्थानी चित्रकला का उद्‌भव और विकास, वर्मा हरिशचंद्र, (संपा.) उपरोक्त, पृ. ५३८.

५०) भावे बा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, नवी दिल्ली, १९७६, पृ. १२५.

५१) कित्ता, पृ. ८९.

५२) कित्ता, पृ. १३०-३१.

५३) कित्ता, पृ. १३४.

५४) कित्ता, पृ. १३६.

५५) बोरकर रा.रा., सावंत उत्तम, भारतीय पुरातत्वशास्त्र, नांदेड, २००४, पृ. २१५.

५६) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., मॉडर्न म्युझियम्स, न्यू दिल्ली, १९७३, पृ. १५७.

५७) चंदा मोती, (संपा.) द जरनल ऑफ इंडियन म्युझियम, खंड तिसरा, मुंबई, १९४७, पृ.४८.

५८) ग्रोवर बी.एल्., मॉडर्न इंडियन हिस्ट्री, एस्. चंद ॲण्ड कंपनी, न्यू दिल्ली, २००३, पृ. २५९.

५९) जामखेडकर अ.प्र., पुण्यातील संग्रहालये, टिकेकर अरूण, (संपा.) शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा,पुणे, २०००, पृ. ३४१.

६०) अठ्ठराव्या शतकातील प्राच्य विद्या संशोधक व कायदे पंडित सरविल्यम जोन्स यांने इ.स. १७५४ मध्ये 'एशियाटीक सोसायटी ऑफ बेंगाल' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत इतिहास, संस्कृती, कला, साहित्य या विषयांच्या साधनांचा संग्रह व अभ्यास केला जात होता. या संस्थेने संग्रहालये नाणक संग्रह, वेधशाळा, प्रयोगशाळा यासारखे उपक्रम राबवले. (मराठी विश्व कोश, पृ. २२)

६१) सी.शिवराममूर्ती, उपरोक्त,पृ. १.

६२) चंद्रा मोती, (संपा.) द जरनल ऑफ इंडियन म्युझियम, खंड तिसरा, मुंबई, १९४७, पृ. ४८.

६३) सी. शिवराममूर्ती,उपरोक्त, पृ. १.

६४) बॅनर्जी एन्.आर., द म्युझियम ॲण्ड द एज्युकेशन सिस्टीम, डिव्हाईव्हेडी व्ही.पी., (संपा.) उपरोक्त, पृ. १२९.

६५) सी.शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. १.

६६) कित्ता, पृ. १.

६७) कित्ता, पृ. १.

६८) कित्ता, पृ. १.

६९) चंद्रा मोती (संपा.), उपरोक्त, पृ. ४८.

७०) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त,पृ. २.

७१) कित्ता, पृ. २.

७२) चंद्रा मोती (संपा.), उपरोक्त, पृ. ४८.

७३) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. ६.

७४) कित्ता, पृ. २.

७५) कित्ता, पृ. २, ६.

७६) कित्ता, पृ. २.

७७) कित्ता, पृ. २.

७८) कित्ता, पृ. ७.

७९) चंद्रा मोती (संपा.),उपरोक्त, पृ. ४८-४९.

८०) बोरकर रा.रा., महाराष्टातील शासकीय वस्तुसंग्रहालये, गगराणी भूषण, (संपा.) लोकराज्य, मुंबई, २००६, पृ. २.

८१) बॅनर्जी एन.आर., उपरोक्त, पृ. १२९.

८२) वर्मा डी.एन्., स्पेशलाइज्ड म्युझियम् इन इंडिया - ए सर्वे, डिव्हाईव्हेडी व्ही.पी., (संपा.) उपरोक्त, पृ. २५०-५१.

८३) कृष्णा आनंद, डेव्हलपमेंट ऑफ अॅन आर्ट म्युझियम - ए केस स्टडी, व्ही.पी. डिव्हाईव्हेडी, (संपा.) पृ. १४२.

८४) बॅनर्जी एन.आर., उपरोक्त, पृ. १२९.

८५) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ. १६१.

८६) बोरकर रा.रा., सावंत उत्तम, उपरोक्त, पृ. ११६-१७.

८७) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी.,उपरोक्त, पृ. १७३-८०.

८८) बोरकर रा.रा., सावंत उत्तम, उपरोक्त, पृ. ११७.

८९) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. २.

९०) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

९१) बोरकर रा.रा., डॉ. सावंत उत्तम, उपरोक्त, पृ. २१६.

९२) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

९३) बोरकर रा.रा., सावंत उत्तम, उपरोक्त, पृ. १६२.

९४) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. ५.

९५) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

९६) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ. १६२.

९७) जामखेडकर अ.प्र., उपरोक्त,पृ. ३४४.

९८) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

९९) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. ४.

१००) वाजपेय हेना, एज्युकेशन अॅण्ड चिल्ड्रन्स् म्युझियम्स् इन इंडिया,डिव्हाईव्हेडी व्ही.पी. (संपा.), उपरोक्त, पृ. १५७-१५९.

१०१) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. ५.

१०२) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७४.

१०३) त्रिवेदी आर.डी., उपरोक्त, पृ. २८१.

१०४) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. ५-६.

१०५) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

१०६) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. ४.

१०७) कित्ता, पृ. १३.

१०८) कित्ता, पृ. ३.

१०९) बोरकर रा.रा., सावंत उत्तम, उपरोक्त, पृ. २२१-२३.

११०) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. ३.

१११) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

११२) सी. शिवराममूर्ती, उपरोक्त, पृ. ३.

११३) बोरकर रा.रा., सावंत उत्तम, उपरोक्त, पृ. २१८-१९.

११४) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

११५) बोरकर रा.रा., सावंत उत्तम, उपरोक्त, पृ. २१८.

११६) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

११७) सत्या प्रकाश, पर्सनल म्युझियम्स इन इंडिया, डिव्हाईव्हेडी व्ही.पी.(संपा.), उपरोक्त,पृ. २३२-३३.

११८) बक्षी एस्.जे., डिव्हाईव्हेडी व्ही.पी., उपरोक्त,पृ. १७३-८०.

-----